# जगद् गुरू संतश्रेष्ठ
# श्री तुकाराम महाराज
# यांच्या अभंगांचा गाथा

# मंगलाचरण : अभंग ६

१.

समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।
तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥
आणीक न लगे मायिक पदार्थ ।
तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥
ब्रह्मादिक पदें दु:खाची शिराणी ।
तेथें दुच्श्रित झणी जडों देसी ॥२॥
तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म ।
जे जे कर्मधर्म नाशवंत ॥३॥

२.

सुंदर तें ध्यान उभे विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनियां ॥१॥
तुळसीचे हार गळां कासे पीतांबर ।
आवडे निरंतर तें चि रूप ॥ध्रु.॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं ।
कंठी कौस्तुभमणि विराजित ॥२॥
तुका म्हणे माझें हें चि सर्व सुख ।
पाहीन श्रीमुख आवडीनें ॥३॥

३.

सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती ।
रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्व काळ ॥ध्रु.॥
विठो माउलिये हा चि वर देईं ।
संचरोनि राहीं ह्रूदयामाजी ॥२॥
तुका म्हणे कांही न मागे आणीक ।
तुझे पायीं सुख सर्व आहे ॥३॥

४.

राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशिकळा लोपलिया ॥१॥
कस्तुरीमळवट चंदनाची उटी ।
रूळे माळ कंठी वैजयंती ॥ध्रु.॥
मुगुट कुंडले श्रीमुख शोभलें ।
सुखाचें ओतलें सकळ ही ॥२॥
कासे सोनसळा पांधरे पाटोळा ।
धननीळ सांवळा बाइयानो ॥३॥
सकळ ही तुम्ही व्हा गे एकीसवा ।
तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥४॥

५.

कर कटावरी तुळसीच्या माळा ।
ऐसें रूप दोळां दावीं हरी ॥१॥
ठेविले चरण दोन्ही विटेवरी ।
ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ध्रु.॥
कटीं पीतांबर कास मिरवली ।
दाखवीं वहिली ऐसी मूर्ती ॥२॥
गरुडपारावरी उभा राहिलासी ।
आठवें मानसीं तें चि रूप ॥४॥
तुका म्हणे माझी पुरवावी आस ।
विनंती उदास करूं नये ॥५॥

६.

गरुडाचें वारिकें कासे पीतांबर ।
सांवळें मनोहर कैं देखेन ॥१॥
बरवय बरवंटा घनमेघ सांवळा ।
वैजयंतीमाळा गळां शोभे ॥ध्रु.॥
ओतींव श्रीमुख सुखाचें सकळ ।
वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी ॥३॥
उद्दव अक्रूर उभे दोहींकडे ।
वर्णिती पवाडे सनकादिक ॥४॥
तुका म्हणे नव्हे आणिकांसारिखा ।
तो चि माझा सखा पांडुरंग ॥५॥

Jagadguru Santshresht Shri Tukaram Maharaj's Abhang Gatha

Mangalacharan : Abhang 6

Abridged from – Shri Sant Tukaram Maharaj Sansthan's (Sri Kshetra Dehu, Pune, India) published works

Part One

Placed for reading by one and all – with kind permission of the Shri Sant Tukaram Maharaj Sansthan
For non-profit use for knowledge and spread of the words of Shri Sant Tukaram Maharaj

Retyped in Baraha Pad in Gargi unicode font and uploaded for open non copyright non profit use

Bharat Bhushan
bharatbhushan@yahoo.com

The Abhang Gatha is also available at http://tukaram-maharaj.blogspot.com